साप्ताहिक

"एकच ध्येय... एकच आवाज"

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक २८ वा | सोमवार, दि. २७/०७/२०२६ ते दि. ०२/०८/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये


# धुळेकरांच्या स्वप्नातील छत्रपती शिवरायांचा २१ फुटी पुतळा अखेर स्थानापन्न!

## उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाची स्थगिती सर्वोच्च न्यायालयाने उठविली

## धुळेकरांच्या जल्लोषात आमदार अनुपभैया अग्रवाल यांच्या हस्ते विधिवत प्रतिष्ठापना

धुळे – येथील मालेगाव रोडवरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या ठिकाणी आज आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला धुळेकरांना प्रतीक्षा असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याची विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. धुळेकरांच्या स्वप्नातील छत्रपती शिवरायांचा २१ फूट उंच पूर्णाकृती पुतळा या जागेवर विराजमान होत असल्याचे आम्हाला विशेष समाधान आणि आनंद आहे. धुळेकरांनाही नक्कीच याचा आनंद होईल, असा विश्वास शहराचे आमदार अनुपभैया अग्रवाल यांनी आज व्यक्त केला.

येथील मालेगाव रोडवरील जुन्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या ठिकाणी २१ फूट उंच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्यासह स्मारकाचे काम आमदार अनुपभैया अग्रवाल यांच्या संकल्पनेतून सुरू होते. मात्र, शिवसेनेच्या (उबाठा गट) पदाधिकाऱ्यांनी विविध चुकीचे आरोप करत याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. त्यात खंडपीठाने स्मारकाच्या कामाला स्थगिती दिली होती. त्यामुळे गेल्या सात महिन्यांपासून स्मारकाचे काम ठप्प होते. याबाबत महापालिका प्रशासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात महिनाभरापूर्वी याचिका दाखल करून ही स्थगिती उठविण्याची विनंती केली होती. महापालिकेच्या या याचिकेवर निर्णय देताना गेल्या बुधवारी (ता. २२) सर्वोच्च न्यायालयाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या कामाला औरंगाबाद खंडपीठाने दिलेली स्थगिती उठविली. यामुळे या स्मारकाच्या कामाचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यानुसार आमदार अग्रवाल यांच्या हस्ते आज स्मारकाच्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे विधिवत पूजन करून प्रतिष्ठापना करण्यात आली.

महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्स्ना पाटील, भाजप बेटी बचाव बेटी पढाव्वच्या प्रदेश सहसंयोजिका अल्पा अग्रवाल, माजी महापौर तथा नगरसेविका कल्पना महाले, डॉ. माधुरी बोरसे–बाफना, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, गटनेत्या किरण कुलेवार, नगरसेविका योगिता कुटे, पूनम शिरसाट, वैभवी दुसाने, कृपेश नांद्रे, जयेश वावदे, भाजपचे महानगर सरचिटणीस शशी मोगलाईकर, पवन जाजू, उपाध्यक्ष अजय अग्रवाल, पृथ्वीराज पाटील, आकाश परदेशी, मराठा क्रांती मोर्चाचे पदाधिकारी सुधाकर बेंद्रे, भानुदास बगदे, राजेंद्र काळे, राजेंद्र इंगळे, राजेंद्र चव्हाण, विनोद जगताप, नैनेश साळुंके, रणजित भोसले, वैभव मराठे, प्रीतम काळे, विवेक बागूल, राजेश पवार, अमित भोसले, रजनीश निंबाळकर, अमोल मराठे, श्याम रायगुडे, मनोज ढवळे, वामन मोहिते, पप्पू माने, चंद्रकांत थोरात, प्रभाकर वाघ, विकी परदेशी, मयूर शार्दूल, अमोल सूर्यवंशी, संतोष परदेशी, संदीप बैसाणे, हेमंत लोणारी यांच्यासह शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार अग्रवाल म्हणाले, की छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघलांशी सामना करत हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. त्यांनी निर्माण केलेल्या राज्याच्या मातीत आपण आज श्वास घेत आहोत. महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण भारताच्या कणाकणात छत्रपती शिवरायांचे अस्तित्व आहे. त्यांच्यामुळे आपण आज या महाराष्ट्रात राहत आहोत. अशा प्रत्येक भारतीयाच्या मनातील जाणता राजाच्या स्मारकाला विरोध करणे आणि त्यासाठी छत्रपती शिवरायांच्या द्वेषयांकडून न्यायालयात याचिका दाखल करणे हा अतिशय दुर्दैवी प्रकार होता. यामुळे छत्रपतींच्या स्मारकाच्या कामाला उशीर तर झालाच शिवाय मोठ्या प्रमाणात कालापव्यय तसेच खर्च वाढला. हा वाढलेला खर्च स्मारकाला विरोध करणारे भरणार आहेत का, असा सवालही आमदार अग्रवाल यांनी केला.

आमदार अग्रवाल म्हणाले, की शहरातील आदिशक्ती श्री एकवीरामाता मंदिरासमोर साकारल्या जाणाऱ्या देशातील एकमेव ५१ शक्तिपीठाच्या कामालाही विरोधकांनी याचिका दाखल करत विरोध केला. त्यामुळे हे काम तर थांबलेच. शिवाय न्यायालयाने १२ लाख रुपये भरून त्रयस्थ संस्थेकडून सर्वेक्षणाचा आदेश दिला आहे. आता हे १२ लाख रुपये कोण भरणार? मी तर म्हणतो, ज्यांना असे वाटते, की हे काम चुकीचे आहे त्यांनी ते १२ लाख रुपये भरून सर्वेक्षणाद्वारे सिद्ध करून दाखवावे. मात्र, ते असे करणार नाहीत. शहरातील टॉवर गार्डनबाबतही असाच प्रकार



घडला. शहरात सुरू असलेल्या विकासकामांमध्ये विनाकारण खोडा घालायचा, हा प्रकार आहे. याचा जाब आता धुळेकर नागरिकांनीच विरोधकांना विच

तब्बल २१ फूट उंच असलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा हा पूर्णाकृती पुतळा दोन मोठ्या क्रेनच्या सहाय्याने तब्बल ६० ते ७० फूट उंचीवरील जागेत विराजमान करण्यात आला. यावेळी शहरातील शिवप्रेमींसह धुळेकर नागरिक आणि भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व हिंदुत्ववादी संघटनांचे कार्यकर्ते या सोहळ्याचे साक्षीदार ठरले. पुतळा विराजमान करण्यापूर्वी आमदार अग्रवाल, महापौर परदेशी, श्री. अंपळकर, श्री. बेंद्रे आदींच्या हस्ते जागेचे शुद्धीकरण, पूजन करण्यात आले. यानंतर महाराजांचा पुतळा विराजमान करण्यात आला. यानंतर आमदार अग्रवाल यांच्यासह सर्व उपस्थितांनी पूजन करून आरती केली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचा जयजयकार करणाऱ्या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

## शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभाग आहिल्या नगर जिल्हा उपाध्यक्षपदी अंबादास लष्करे यांची तर, छ.संभाजीनगर शहराध्यक्षपदी कपिल सोसे यांची निवड

मुंबई – शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाचे राज्य संपर्क प्रमुख अनिल धमने पाटील आणि सोशल मिडीया राज्यप्रमुख संजय कुसळकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे की, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्य मंत्री एकनाथ भाई शिंदे यांच्या आदेशानुसार व शिवसेनेचे मुख्य सचिव संजय मोरे, खा .डॉ . श्रीकांत शिंदे, प्रशांत पालांडे, यांच्या मागदर्शनाखाली ओबीसी नेते तथा शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. डॉ पी बी कुंभार यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभाग आहिल्या नगर जिल्हा उपाध्यक्ष पदी अंबादास लष्करे यांची तर, छ. संभाजी नगर शहराध्यक्ष पदी कपिल सोसे यांची नियुक्ती पत्र प्रदेशाध्यक्ष ॲड. डॉ पी बी कुंभार यांच्या सही निशी देण्यात आले असून या नियुक्ती पत्रावर वंदनीय हिंदू हृदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण याचा





आपण सक्रियपणे प्रचार प्रसार कराल व तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी आपण सर्व घटकांना सोबत घेऊन संघटन वाढवून कार्य कराल असा विश्वास व्यक्त करूण आपणास पुढील कार्यास शुभेच्छा देतोत असा उल्लेख नियुक्ती पत्रात केलेला आहे या निवडी बद्दल अहिल्या नगर, छ.संभाजी नगर जिल्ह्यातील पदाधिकारी, शिवसैनिकांनी निवनिर्वाचित पदअधिकारी त्यांच्यावर शुभेच्छा चा वर्षाव केला जात आहे.

## कन्यादान योजनेसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

धुळे (जिमाका) – भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) तसेच विशेष मागास प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जोडप्यांसाठी शासनामार्फत कन्यादान योजना राबविण्यात येत असून, या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित स्वयंसेवी संस्था, समाजसेवी संघटना तसेच पात्र लाभार्थ्यांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक सुभाष फंड यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. या योजनेअंतर्गत सामूहिक विवाह सोहळ्यात सहभागी होणाऱ्या प्रत्येक पात्र जोडप्यास शासनामार्फत रु. २५ हजारांचे आर्थिक सहाय्य दिले जाते. तसेच सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेला प्रत्येक पात्र जोडप्यामागे रु. ४ हजारांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येते. सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यास इच्छुक स्वयंसेवी संस्था तसेच पात्र लाभार्थ्यांनी शासनाने निर्धारित केलेल्या अटी व शर्तींनुसार आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत.

# लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

(मागील अंकावरून)

इ.स. १८९७ साली महाराष्ट्रात गाठीच्या प्लेगची साथ आली. उंदीर नष्ट करण्यासाठी ब्रिटिश सरकारने पुण्यात फवारणी मोहीम सुरू केली तेव्हा पुणेकरांनी विरोध केला. हा विरोध मोडून काढण्यासाठी पुण्याचा ब्रिटिश रेसिडेंट वॉल्टर चार्ल्स रँड याने लष्कराची मदत घेतली. व त्यांचे जवान पुण्यात आरोग्य विभागाच्या मदतीला आले, घरात घुसून जबरदस्तीने फवारणी करवून घेऊ लागले. आणि साथीचा फैलाव झाल्याचे कारण सांगून लोकांचे सामान, कपडे-लत्ते सर्रास जाळून टाकू लागले, यामुळे पुण्यात एकच हाहाकार उडाला. रँडसाहेब मुद्दाम आमची घरे जाळीत आहे, अशी भूमिका त्यांनी घेतली. टिळकांनी केसरीमधून या भूमिकेला उचलून धरले. सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय? हा टिळकांनी अग्रलेख याच संदर्भातील आहे. टिळक लिहितात :रँडसाहेबांच्या फवारणीचा मोर्चा आता आमच्या घरात माजघरात पोहोचला आहे. रँडसाहेबांचे लाडके सोल्जर पायातल्या खेटरांसकट फवारणीचे धोटे घेऊन आमच्या घरात घुसतात. घरातले सामान रस्त्यावर फेकून देतात, जाळून टाकतात, हे कमी म्हणून की काय आमच्या देवघरात घुसून उंदरांबरोबर आमच्या विघ्नहर्त्या गणेशावरही फवारणी करण्यापर्यंत यांची मजल गेली आहे.

इ.स. १८९६ साली महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला. टिळकांनी शेतकऱ्यांना संघटित होण्याचे आवाहन केले तसेच त्यांच्या हक्कांबद्दल जागरूक केले. आपल्या केसरी या वर्तमानपत्राद्वारे त्यांनी सरकारला त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली. ब्रिटिश सरकार 'दुष्काळ विमा निधी' अंतर्गत लोकांकडून पैसा गोळा करत असे. त्याचा वापर लोकांसाठी करण्यात यावा असे त्यांनी सरकारला ठणकावून सांगितले. तसेच सरकारच्या 'ऋाळपश ठशश्रळशष उेवश' नुसार दुष्काळ पडला असतांना शेतकऱ्यांना कर भरण्याची आवश्यकता नव्हती. तरी काही भागात सक्तीने करवसुली करण्यात येत असे. याविरुद्ध लोकांना जागरूक करण्याचे काम त्यांनी केसरीद्वारे केले. त्यांच्या स्वय

ंसेवकांनी महाराष्ट्रभर गावागावात फिरून लोकांना 'ऋाळपश ठशश्रळशष उेवश' बद्दल माहिती देणारी पत्रके वाटली. याबरोबरच धनिकांनी व दुकानदारांनी अन्न व पैसा दान करावे असे आवाहन केले व यातून अनेक ठिकाणी सार्वजनिक खानावळी चालवल्या गेल्या.

तत्कालीन भारतीय नेतृत्वात भारतास स्वातंत्र्य मिळण्यासाठी इंग्रजांशी व्यवहार कसा असावा याबद्दल दोन स्पष्ट मतप्रवाह होते. इंग्रजांशी जुळवून घेउन भारतास स्वातंत्र्य देण्यास त्यांची मनधरणी करणे हा मतप्रवाह मवाळवाद समजला जातो तर इंग्रजांनी भारतास स्वातंत्र्य दिलेच पाहिजे व त्यासाठी त्यांच्याशी असलेले मतभेद उघड करून वेळ आल्यास कारवाया, आंदोलने करणे हा मतप्रवाह जहालवाद समजला जातो. लोकमान्य टिळक जहालवादी होते. ८ जून १९१४ या दिवशी मंडालेच्या कारागृहातून टिळक सुटले आणि त्यांनी पूर्ववत आपले काम चालू केले. काँग्रेसमध्ये दुफळी माजून गंभीर मतभेद निर्माण झाले होते. त्यांना एकसंघ करण्यासाठी टिळकांनी फार प्रयत्न केले; परंतु त्यांना यश आले नाही. शेवटी त्यांनीच एक स्वतंत्र शक्तिमान संघटना निर्माण करण्याचे ठरवले. यालाच 'होमरूल लीग' असे म्हणतात. 'स्वराज्यप्राप्ती' हेच या लीगचे ध्येय होते. मंडालेच्या तुरुंगात असताना त्यांनी गीतारहस्य हा ग्रंथ लिहिला.

टिळकांच्या बाबतीमध्ये राम गणेश गडकरी असे म्हणाले होते की, बाळ गंगाधर टिळक हे मंडालेला गेल्यापासून या पुणे शहरात दुरून येणारा माणूस पाहून चटकन हातातली विडी विझवावी, या लायकीचे कोणी राहिलेले नाहीत. विष्णूशास्त्री चिपळूणकर हे एका सरकारी शाळेत शिक्षक होते. निबंधमालाकार विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी सरकारी नोकरी सोडून शाळा काढण्याचे ठरविले होते तेव्हा टिळक व आगरकर दोघेही त्यांना भेटले. १ जानेवारी १८८० रोजी न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना झाली. टिळकांनी विनावेतन शिक्षकी पेशा पत्करला. विष्णूशास्त्री १८८२ मध्ये मरण पावले तथापि १८८४ मध्ये वेडरबर्न, वर्ड्स्वर्थ, मंडलिक, तेलंग, दांडेकर, य.मो. केळकर, भांडारकर वगैरे प्रभृतींच्या मदतीने टिळक-आगरकरांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली आणि या संस्थेतर्फे १८८५ मध्ये फर्ग्युसन महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. येथे टिळक गणित व संस्कृत विषय शिकवीत. पुढे वैचारिक मतभेदांमुळे टिळक येथून बाहेर पडले , नंतर त्यांच्या व गोपाल कृष्ण गोखल्यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण प्रसारक मंडळी ची स्थापना झाली . पुढे टिळकांच्या विनंतीस अनुसरून पुण्याच्या मध्याजवळ सदाशिव पेठेत महाविद्यालयास सरदार जगन्नाथ महाराज पंडित ह्यांनी आपली जागा भाडेकरारावर दिली. हे नवीन महाविद्यालय जामखंडी चे संस्थानिक सर परशुरामभाऊ पटवर्धन ह्यांच्या पुण्यस्मृतीस स्मरून दिलेल्या २ लक्ष रुपयांच्या देणगीने बांधण्यात आले . त्याचे नामकरण सर परशुरामभाऊ पटवर्धन महाविद्यालय असे करण्यात आले.

राजकीय जनजागृतीसाठी इ.स. १८९३ साली टिळकांनी घरगुती गणेशोत्सव हा सार्वजनिक रित्या सुरू केला आणि महात्मा फुलेंनी सुरू केलेल्या शिवाजी जयंतीला व्यापक स्वरूपात साजरी करणं केले. शिवजयंती आणि गणेशोत्सव या सार्वजनिक सणांद्वारे ब्रिटिशांविरुद्ध लोकांना उभे राहण्यासाठी जागृत करणे हे टिळकांचे उद्दिष्ट होते. मुंबईतील वासुदेव बळवंत फडके चौक ते कारनॅक पूल जाणाऱ्या रस्त्याला लोकमान्य टिळक मार्ग म्हणून ओळखले जाते.

चिपळूणकर, टिळक व आगरकर यांनी १८८१ मध्ये आर्यभूषण छापखाना काढला. टिळकांनी इतर सहकाऱ्यांच्या मदतीने इ.स. १८८१ साली केसरी व मराठा ही वृत्तपत्रे सुरू केली. यापैकी केसरी हे मराठीतून प्रसिद्ध होत होते तर मराठा हे इंग्रजीमधून. प्रारंभी आगरकर केसरीचे व टिळक मराठाचे संपादक होते. अलिप्त भारतीय समाजाला भोवताली घडणाऱ्या घटनांचा निरपेक्ष अहवाल देणे हा केसरीचा मुख्य उद्देश होता. जनतेला स्वातंत्र्य चळवळीसाठी उद्युक्त करणे व सामाजिक परिवर्तनांसाठी जनजागृती करणे या विचारांनी केसरी सुरू झाले. केसरीमधून त्या

**विशेष लेख...**

काळातील राजकीय आणि सामाजिक विषयांवर भाष्य तसेच समकालीन मराठी साहित्याची परीक्षणे प्रकाशित होत असत. मराठा वृत्तपत्र हे मुख्यत: शिक्षित भारतीय समाजासाठी होते. त्यामध्ये देश-विदेशातील घटना व त्यांवरील भाष्य छापून येत असे. दोन्ही वर्तमानपत्रे भारतीयांमध्ये खूप लवकर लोकप्रिय झाली. इ.स. १८८२च्या अखेरीस केसरी हे भारतातील सर्वाधिक खप असलेले प्रादेशिक वर्तमानपत्र बनले.

सुरुवातीला आगरकरांकडे ' केसरी 'चे संपादकपद तर टिळकांकडे ' मराठा ' या इंग्रजी नियतकालिकाची संपादकीय जबाबदारी होती. तरीही टिळकांचे अग्रलेख या काळातही 'केसरी'त प्रसिद्ध होत होतेच. पुढे दोघांत तात्त्विक मतभेद झाले आणि टिळकांनी कर्जासह ' केसरी 'चे संपादकपद स्वतःकडे घेतले. तेव्हापासून त्यांच्या मृत्यूपर्यंत टिळकांचे अग्रलेख हाच ' केसरी 'चा आत्मा होता. १८८१ ते १९२० या चाळीस वर्षांच्या काळात टिळकांनी ५१३ अग्रलेख लिहिले. ' सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय ', ' उजाडले पण सूर्य कुठे आहे ,' ' टिळक सुटले पुढे काय ', ' प्रिन्सिपॉल , शिशुपाल की पशुपाल ', ' टोणग्याचे आचळ ', 'हे आमचे गुरूच नव्हेत ', ' बादशहाब्राह्मण झाले ' हे त्यांचे काही प्रसिद्ध अग्रलेख आहेत.

टिळकांच्या काळात, महिला आणि जातीच्या प्रश्नावर काँग्रेसमध्ये दोन गट होते - सुधारणावादी आणि पुराणमतवादी. जातीय भेदभाव दूर करणे, बालविवाहावर बंदी घालणे, विधवा विवाहाचे समर्थन करणे आणि महिला शिक्षण हे सुधारणावादी विचारधारेचे चार मुख्य आधार होते. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, डब्ल्यू.सी. बॅनर्जी, विष्णू हरी पंडित आणि नंतर गोपाळ गणेश आगरकर तसेच गोपाळ कृष्ण गोखले आदी या पक्षात होते. दुसरीकडे, विष्णूशास्त्री चिपळूणकर आणि टिळक हे रूढीवादी विचारांचे नेतृत्व करीत होते.

टिळकांनी घराबाहेरील स्त्री शिक्षणाला टिया काळी विरोध केला. टिळकांचे मत होते की परकीय सत्ता घालवून स्वराज्य आणल्यावर सामाजिक बदल या त्या अनुरूप निर्णय घेता येतील . स्त्रियांना घरीच शिक्षण घेऊन शिक्षित व्हावे , मात्र बाहेर जाऊन तूर्तास शिक्षण घेऊ नये हे टिळकांचे मत होते. रानडे, गोखले, आगरकर प्रभृति ह्या विपरीत स्त्रियांनी बाहेर जाऊन शिक्षण घ्यावे हे मत ठेवणाऱ्या होत्या. विष्णूशास्त्री चिपळूणकर आणि टिळक यांच्या नेतृत्वात काँग्रेसच्या कट्टरपंथी गटाने १८८१ ते १९२० च्या दरम्यान कशाप्रकारे मुलींसाठी शाळा सुरू करण्याला आणि प्रत्येक समुदायाला शिक्षण देण्याच्या प्रयत्नांना विरोध केला. या गटाच्या विरोधामुळे महाराष्ट्रातील ११ पैकी ९ नगरपालिकांमध्ये प्रत्येकाला शिक्षण देण्याच्या प्रस्तावाला पराभवाला सामोरे जावे लागले. या गटाने राष्ट्रवादी शिक्षणाचा पुरस्कार केला, ज्यामध्ये धर्मशास्त्रांचे अध्यापन व त्याच्या कौशल्यांचा अभ्यास करण्यावर भर देण्यात आला.२०. ह्या प्रकरणात आगरकर, आपटे आदि मंडळींनी पुढाकाराने स्त्री शिक्षणास असलेला विरोध मावळला वकालांतराने पुण्यात फर्ग्युसन महाविद्यालयात स्त्रियांना प्रवेश मिळण्यास सुरुवात झाली.

त्यावेळी मुलींचे लग्न अगदी लहान वयात होते, त्यामुळे त्यांना असह्य छळ व यातना सहन करावा लागला. एका प्रसिद्ध प्रकरणात, मुलगी फूलमणीचे ११व्या वर्षीच लग्न केले होते, तिच्या ३५ वर्षीय पतीने तिच्याशी जबरदस्तीने संभोग (लैंगिक अत्याचार) केल्यामुळे तिचा मृत्यू झाला. ब्रिटिश भारतात अशा अनेक घटना घडल्या होत्या ज्यामध्ये अल्पवयीन मुलींशी लैंगिक संबंध ठेवल्याने त्या अपंग झाल्या. विवाह आणि संमतीने लैंगिक संबंध यासाठीचे वय वाढविण्याची मागणी भारतातील समाजसुधारकांकडून करण्यात येत होती. म्हणूनच ब्रिटिश सरकारने १८९१ साली एक कायदा एज ऑफ कॉन्सेन्ट क्ट १८९१ तयार केला आहे ज्यानुसार १२ वर्षापेक्षा कमी वयाच्या विवाहित किंवा अविवाहित मुलीशी लैंगिक संबंध ठेवणे बलात्काराच्या प्रकारात येईल. काँग्रेसचे सुधारवादी लोकांचे या विधेयकाला समर्थन होते, परंतु टिळकांनी या प्रकरणात ब्रिटिश सरकारच्या हस्तक्षेपाला विरोध केला. ते म्हणाले - 'हा सरकारचा कायदा योग्य आणि उपयुक्त असू शकेल, परंतु तरीही सरकारने आमच्या सामाजिक परंपरा आणि जीवनशैलीत हस्तक्षेप करावा अशी आमची इच्छा नाही.'

डेक्कन कॉलेजमध्ये असतांना टिळकांची गोपाळ गणेश आगरकर यांच्याशी मैत्री झाली. आगरकरांकडे केसरीच्या संपादकपदाची धुरा टिळकांनी दिली होती. पण नंतर दोघांत बिनसले. टिळकांचे संस्थेतील एकंदर धोरणासंबंधी मतभेद झाले. आपल्या चाळीस पानी राजीनाम्यात टिळकांनी 'निर्वाहापुरते वेतन' या तत्त्वाऐवजी 'सांपत्तिक स्थितीनुसार वेतन' तसेच 'राष्ट्रीय शिक्षण संस्थे'च्या उद्दिष्टाविरुद्ध 'सरकारच्या मदतीवर चालणारी संस्था' हे धोरण संस्थेच्या मूळ धोरणाला धक्के देणारे आहे, असे आग्रहाने सांगितले. या प्रश्नावर त्यांचा आगरकरांशी वाद झाला. याशिवाय दुसरा वाद आधी काय? राजकीय की सामाजिक स्वातंत्र्य? या विषयावर झाला होता. जातिभेद नष्ट झाले पाहिजेत, असे ते निकराने मांडीत. परकीय सरकारने लोकमताची पर्वा न करता सुधारणेसाठी योग्य ते कायदे करावेत, असे आगरकरांचे मत होते. टिळकांचे म्हणणे असे होते की, आमच्या सुधारणा आम्हीच करू, परकीय सत्तेची ढवळाढवळ आमच्या सामाजिक वा धार्मिक बाबतीत होऊ नये. मात्र लोकमत अनुकूल असेल आणि धर्मवचनांच्या बाबतींत तडजोड होत असेल, तर असा कायदा करण्यास आमची काही हरकत नाही.

## चरणसेवा'ने जपले लाखो वारकऱ्यांचे आरोग्य; ४.९६ लाखांहून अधिक वारकऱ्यांना लाभ

मुंबई - गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या 'चरणसेवा' उपक्रमाचा समारोप शुक्रवार, दि. २४ जुलै रोजी होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामार्फत लोकसहभागातून हा उपक्रम राबविण्यात आला. यंदाच्या आषाढी वारीत राज्यातील १४ जिल्ह्यांतील ४ लाख ९६ हजारांहून अधिक वारकऱ्यांनी थेट चरणसेवा आणि आरोग्यसेवेचे लाभ घेतला. आषाढी वारीदरम्यान वारकऱ्यांना होणारा शारीरिक ताण, स्नायूदुखी, पायांना येणारे फोड, थकवा तसेच पावसाळ्यातील संसर्गजन्य आजारांचा धोका लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला. मागील वर्षी सात जिल्ह्यांमध्ये सुरू झालेल्या या उपक्रमाचा यंदा विस्तार करून तो दिंडी मार्गावरील १४ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आला.

सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, बुलढाणा, अकोला, जालना, बीड, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, वाशिम, सांगली, अमरावती आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांतील १४० मुक्कामस्थळांवर सेवा केंद्रे उभारण्यात आली. या केंद्रांमधून वारकऱ्यांना चरणसेवा, मोफत आरोग्य तपासणी, फिजिओथेरपी, प्रथमोपचार, आवश्यक औषधांचे वितरण, रुग्णवाहिका सुविधा तसेच गरजेनुसार पुढील उपचारांची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमात १६४ आरोग्य संस्थांनी सहभाग घेतला. ७ हजार ५३८ स्वयंसेवक तसेच ११ हजार ३३१ डॉक्टर, वैद्यकीय प्रशिक्षणार्थी विद्यार्थी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी सेवाकार्यात योगदान दिले. सेवेसाठी १० हजार टी-शर्ट आणि ३ हजार लिटर आयुर्वेदिक औषधी तेलाचा उपयोग चरणसेवेसाठी करण्यात आला. तसेच ८ रथांद्वारे जनजागृती करण्यात आली. लोकसहभागातून साकारण्यात आलेल्या

# उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्वातून 'विकसित महाराष्ट्र'च्या ध्येयाला बळ–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई – राज्य शासनाच्या सर्वसमावेशक विकासाच्या धोरणाला उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्वाची प्रभावी साथ लाभत आहे. शासन आणि उद्योग क्षेत्राच्या भागीदारीतून ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साध्य होत आहे. अशा उपक्रमांमुळे 'विकसित महाराष्ट्र २०४७' या राज्याच्या ध्येयाला बळ मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांना पूरक ठरणारे उद्योगांचे सामाजिक उत्तरदायित्वाचे उपक्रम ग्रामीण भागातील नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवत आहेत. आरोग्य, पोषण, जलसुरक्षा, पर्यावरण संवर्धन, क्रीडा आणि शालेय पायाभूत सुविधा या क्षेत्रांमध्ये सातत्यपूर्ण काम करणारे उपक्रम समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत.

मोंडेलेज इंडियाच्या 'शुभ आरंभ' या प्रमुख सामाजिक उपक्रमांतर्गत गेल्या १३ वर्षांपासून पुणे जिल्ह्यातील मावळ आणि खेड तालुक्यातील ६० गावांमध्ये स्थानिक गरजांनुसार आरोग्य, पोषण, शिक्षण, जलसंधारण, पर्यावरण संवर्धन, क्रीडा आणि समुदाय विकासासाठी विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांमुळे हजारो कुटुंबांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडून आला असून, शासनाच्या विविध योजनांनाही प्रभावी पूरक बळ मिळाले आहे.

आरोग्य सुविधांचे बळकटीकरण; लाखो नागरिकांना लाभ – आरोग्य क्षेत्रात आयुष्मान भारत अभियानाशी सुसंगत पद्धतीने ५० हेल्थ अँड वेलनेस सेंटरचे आधुनिकीकरण व सक्षमीकरण करण्यात आले असून, त्याचा सुमारे ३.२ लाख नागरिकांना थेट लाभ झाला आहे. ॲनिमिया मुक्त भारत अभियानाअंतर्गत महिलांमध्ये आणि किशोरवयीन मुलींमध्ये रक्तक्षय ओळखण्यासाठी विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या माध्यमातून सुमारे ५ हजार उच्च जोखमीच्या गर्भवती महिलांची ओळख करून त्यांना विशेष उपचारासाठी संदर्भित करण्यात आले, तर एक हजारांहून अधिक पाच वर्षांखालील बालकांना प्रगत उपचारासाठी पाठविण्यात आले. याशिवाय, २२६ आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन नवजात बालकांची घरपोच आरोग्य तपासणी, उच्च जोखमीच्या रुग्णांची ओळख आणि प्राथमिक आरोग्य सेवा अधिक प्रभावी करण्यात आली. आरोग्य जनजागृतीसाठी विविध विशेष आरोग्य शिबिरे तसेच जागतिक आरोग्य, क्षयरोग, मातृत्व आणि योग दिन साजरा करण्यात आला.

ग्रामीण क्रीडा विकासाला नवी दिशा – 'खेलो इंडिया' अभियानाशी सुसंगत 'शुभ आरंभ स्पोर्ट्स फॉर एक्सलन्स' या उपक्रमातून ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कृती रुजविण्याचे काम करण्यात आले आहे. फुटबॉल आणि कबड्डीसारख्या खेळांमध्ये विद्यार्थ्यांना नियमित प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षक, जीवनकौशल्य प्रशिक्षक आणि स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली आहे. गेल्या दशकात सुमारे ९ हजार विद्यार्थ्यांना विविध क्रीडा प्रशिक्षणाचा लाभ मिळाला असून, त्यामध्ये मुलींचा सहभाग जवळपास ५० टक्के आहे. परिसरात १० क्रीडांगणे विकसित करण्यात आली आहेत. शालेय स्तरापासून राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना सक्षम करण्याचे कार्य सुरू आहे.

शाळांमध्ये पायाभूत सुविधा आणि हरित ऊर्जा उपक्रम – ग्रामीण भागातील शाळांमध्ये सुरक्षित पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी व्यापक पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या आहेत. २७ आरओ पाणी शुद्धीकरण यंत्रणा, १२ स्वच्छतागृहे अनेक शाळांमध्ये संरक्षक भिंती, पेव्हिंग ब्लॉक आणि अन्य सुविधा उभारण्यात आल्या आहेत. हरित ऊर्जेला चालना देण्यासाठी ६० किलोवॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला असून, त्यामुळे ग्रामपंचायतीच्या वीज खर्चात दरवर्षी मोठी बचत होत आहे. तसेच विविध वाड्यांमध्ये सौर पथदिवे बसविण्यात आल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेतही वाढ झाली आहे. जलसंधारणातून शेतीला दिलासा – जलसंधारण क्षेत्रात सहा जलसाठा संरचनांची निर्मिती व दुरुस्ती करण्यात आली आहे. त्यामुळे २,००० लाख लिटर अतिरिक्त पाणी साठवण क्षमता निर्माण झाली आहे. याचा लाभ ३०० एकरांहून अधिक शेती आणि ५०० पेक्षा अधिक शेतकऱ्यांना झाला आहे. याशिवाय, पुढील दोन वर्षांत २० हून अधिक नवीन जलसंधारण प्रकल्प उभारून सुमारे २,५०० लाख लिटर भूजल पुनर्भरण क्षमता निर्माण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये शेततळी, बंधारे, बोअरवेल रिचार्ज आणि पर्जन्यजल संधारणासारख्या उपाययोजनांचा समावेश आहे.

पोषण शिक्षणातून निरोगी पिढी घडविण्याचा प्रयत्न – शालेय विद्यार्थ्यांमध्ये सकस आहार आणि आरोग्यदायी जीवनशैलीची सवय निर्माण करण्यासाठी पुणे, सिंधुदुर्ग आणि मुंबई जिल्ह्यातील २३५ शाळांमध्ये पोषण शिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला आहे. या माध्यमातून सुमारे ६० हजार विद्यार्थ्यांपर्यंत सुरक्षित आणि सकस आहाराचा संदेश पोहोचविण्यात आला. ४७० शिक्षकांना 'हेल्थ अँड वेलनेस ॲम्बेसेडर' म्हणून प्रशिक्षित करण्यात आले असून, सर्व शाळांमध्ये 'सेहत क्लब' स्थापन करण्यात आले आहेत. अन्न सुरक्षा, स्वच्छता आणि पोषणविषयक जनजागृतीसाठी पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यात आला आहे.

पुढील दोन वर्षांसाठी व्यापक कृती आराखडा – या उपक्रमाचा पुढील टप्पा अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. आरोग्य सेवा अधिक सक्षम करणे, हेल्थ अँड वेलनेस सेंटरची गुणवत्ता वाढविणे, विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन, ग्रामीण क्रीडा विकासासाठी प्रगत प्रशिक्षण, तसेच जलसंधारण आणि भूजल पुनर्भरणाच्या नव्या प्रकल्पांची अंमलबजावणी यावर विशेष भर देण्यात येणार आहे. शासनाच्या विविध योजनांशी प्रभावी समन्वय साधत ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्य, शिक्षण, जलसुरक्षा आणि जीवनमानात शाश्वत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने हा उपक्रम राज्यासाठी आदर्श ठरत असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

# शासकीय योजनांचा नागरिकांनी लाभ घ्यावा–आमदार मंजुळा गावित
## साक्रीला छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर

धुळे (जिमाका) – राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ पात्र नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन आमदार मंजुळा गावित यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्ताने साक्री येथील सुमंगल लॉन्स येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान' अंतर्गत आयोजित शिबिर आज झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, उपजिल्हाधिकारी बालाजी क्षीरसागर, उपविभागीय अधिकारी रोहन कुवर, आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, तहसीलदार साहेबराव सोनवणे, अपर तहसीलदार अधिकार पेंढारकर, साक्रीच्या नगराध्यक्षा उषा पवार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार श्रीमती मंजुळा गावित म्हणाल्या की, शासनाच्या विविध विभागांच्या योजना एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. गेल्या वर्षभरापासून महसूल विभागामार्फत तालुका व मंडळस्तरावर 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' आयोजित करण्यात येत असून, या माध्यमातून शासनाच्या योजनांचा लाभ थेट पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम होत आहे. महसूल, सामाजिक न्याय, कृषी, आरोग्य, पंचायत राज, आदिवासी विकास, महिला व बालविकास तसेच इतर विभागांच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती आणि लाभ या शिबिरात उपलब्ध करून देण्यात येत आहेत. कृषी विभागाच्या महाडीबीटी पोर्टलवरील योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी तयार करून घ्यावा. केंद्र सरकारकडून १ जुलै पासून विकसित भारत रोजगार हमी योजना (वीबीजी रामजी) योजना सुरू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून ग्रामपंचायत स्तरावर रोजगार उपलब्ध होणार आहे. आयुष्मान भारत, कामगार, कृषी, महसूल, ऊसतोड कामगार, शिक्षण, आरोग्य आदी विभागांच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा.

महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री पाणंद रस्ता योजनेमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत पोहोचण्यासाठी रस्त्यांची सुविधा उपलब्ध होत असून, शेतमालाची वाहतूक सुलभ होण्यास मोठी मदत होत असल्याचेही आमदार श्रीमती गावित यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते म्हणाल्या की, प्रशासन नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. नागरिकांना थेट प्रशासनाशी जोडण्यासाठी ई–सुविधा हा प्रभावी उपक्रम जिल्ह्यात सुरू करण्यात आला आहे. नागरिकांनी या सुविधेअंतर्गत व्हॉट्सप क्रमांकावर किंवा क्यूआर (ठ) कोड स्कॅन करून आपल्या तक्रारी, सूचना किंवा अडचणी थेट प्रशासनाकडे नोंदवाव्यात. यासाठी कोणत्याही कार्यालयात जाण्याची किंवा अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष भेटण्याची आवश्यकता नसून, प्राप्त तक्रारींवर तातडीने कार्यवाही केली जाते. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने सुरू केलेल्या ई–सुविधा उपक्रमाचा नागरिकांनी अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी यावेळी केले.

यावेळी उपजिल्हाधिकारी बालाजी क्षीरसागर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक तहसीलदार साहेबराव सोनवणे यांनी केले. प्रारंभी मान्यवराच्या हस्ते विविध विभागाने लावलेल्या स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले.त्यानंतर आमदार मंजुळा गावित, तसेच जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी स्टॉला भेट देवून पाहणी केली. या शिबिराच्या माध्यमातून पात्र महिलांना शेतकरी प्रमाणपत्र, आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिर, गावठाणातील नागरिकांना स्वामित्व देण्यासाठी सनद वाटप करणे, शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करणे, जीवंत सातबारा मोहीम, शिधा पत्रिकेचे वितरण, आयुष्मान भारत कार्डचे वितरण तसेच विविध विभागाच्या लाभाचे वितरण करण्यात आले.

# टॉप क्लास स्कूल एज्युकेशन योजना विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज सादर करावे

धुळे (जिमाका) – सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयामार्फत टॉप क्लास स्कूल एज्युकेशन योजना (पीएम यशस्वी) अंतर्गत इयत्ता ९ वी ते ११ वीमध्ये शिक्षण घेणाऱ्या ओबीसी, ईबीसी व डीएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. या योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांनी ३१ ऑगस्ट,२०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक सुभाष फंड यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

या योजनेसाठी इयत्ता ९ वी ते ११ वीमध्ये शिक्षण घेणारे आणि ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. २ लाख ५० हजारांपेक्षा कमी आहे, असे विद्यार्थी पात्र आहेत. पात्र विद्यार्थ्यांनी https://scholarships.gov.in/ या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावा. सन २०२५–२६ मध्ये शिकणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांनी योजनेसाठी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर नोंदणी केलीअशा विद्यार्थ्यांनी सन २०२६–२७ करीता अर्जाचे नूतनीकरण करावे. योजनेसाठी संबंधित महाविद्यालयात, विद्यापीठातील विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट, २०२६ आहे. मुख्याध्यापक तसेच प्राचार्य यांनी १०० टक्के पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज भरावेत. त्याचप्रमाणे संबंधित शाळा व महाविद्यालयाने १५ सप्टेंबर, २०२६ पर्यंत सर्व अर्जाची पडताळणी करावी. या योजनेत धुळे जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करावे, असे आवाहन सहाय्यक संचालक सुभाष फंड यांनी केले आहे.

# टॉप क्लास स्कूल एज्युकेशन योजना; विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज सादर करावे

धुळे (जिमाका) – सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयामार्फत टॉप क्लास स्कूल एज्युकेशन योजना (पीएम यशस्वी) अंतर्गत इयत्ता ९ वी ते ११ वीमध्ये शिक्षण घेणाऱ्या ओबीसी, ईबीसी व डीएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून, पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक सुभाष फंड यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. या योजनेसाठी इयत्ता ९ वी ते ११ वीमध्ये शिक्षण घेणारे आणि ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. २ लाख ५० हजारांपेक्षा कमी आहे, असे विद्यार्थी पात्र आहेत. पात्र विद्यार्थ्यांनी https://scholarships.gov.in/ या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावा. नवीन विद्यार्थ्यांनी नोंदणी करताना आधार क्रमांक, जन्मतारीख, मोबाईल क्रमांक आणि ई–मेल आयडी यांचा वापर करावा.

अर्ज भरताना वैयक्तिक माहिती, शैक्षणिक माहिती, बँक खात्याची माहिती, ओबीसी जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, शाळेचा दाखला, गुणपत्रिका आणि पासपोर्ट आकाराचे छायाचित्र अपलोड करणे आवश्यक आहे. अर्ज सादर करण्यापूर्वी सर्व माहिती काळजीपूर्वक तपासूनच अंतिम सादर करावी, असेही सहाय्यक संचालक सुभाष फंड यांनी कळविले आहे.

# शिरपूर एज्युकेशन सोसायटीच्या क्रीडा विभागामार्फत आयोजित दोन दिवसीय संस्थास्तरीय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद

शिरपूर – शिरपूर एज्युकेशन सोसायटीच्या क्रीडा विभागामार्फत दि. १६ व १७ जुलै रोजी दोन दिवसीय संस्थास्तरीय मिशन व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धांचे आयोजन आर. सी.पटेल मेन बिल्डिंग शिरपूर येथील मैदानावर करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव सौ. रेषा पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विश्वस्त सीए विजय भंडारी, विश्वस्त अतुल भंडारी, सीईओ डॉ. उमेश शर्मा, स्पोर्टस इन्चार्ज प्रितेश पटेल यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अकॅडमिक इन्चार्ज पी.व्ही.पाटील, प्राचार्य एस. जे. पाटील, प्राचार्य डॉ. एस एन पाटील, मुख्याध्यापक मनोज पाटील, मुख्याध्यापक प्रदीप गहिवरे, पर्यवेक्षक बी. बी. अग्रवाल, पर्यवेक्षक वाय. व्ही. कोठावदे, क्रीडा संचालक डॉ. विनय पवार, क्रीडा समन्वयक जे.पी.पाटील उपस्थित होते. सदर स्पर्धेत संस्थेतील विविध माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील विविध वयोगटातील एकूण ४८० खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला.

यात संस्थेतील एकूण ३०० मुलांनी सहभाग नोंदविला. मुलांच्या स्पर्धेत १४ वर्षे आतील गटात एकूण ८ संघांनी, तसेच १७ वर्षे आतील गटात १४ संघांनी व १९ वर्षातील गटात ८ संघांनी सहभाग नोंदविला. यात १४ वर्षे आतील प्रथम क्रमांक आर. सी. पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शिरपूर, द्वितीय क्रमांक मुकेश आर. पटेल सीबीएसई स्कूल तांडे यांनी मिळवला. १७ वर्षे आतील मुलांच्या संघात प्रथम क्रमांक आर. सी. पटेल माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय शिरपूर व द्वितीय क्रमांक आर. सी. पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय भोरखेडा संघाने मिळवला. १९ वर्षे आतील मुलांच्या संघात प्रथम क्रमांक आर. सी. पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शिरपूर व द्वितीय क्रमांक आर. सी. पटेल इंग्लिश मीडियम ज्युनियर कॉलेज शिरपूर या संघाने पटकवला. तसेच दि. १७ जुलै रोजी मुलींच्या व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यात संस्थेतील विविध माध्यमिक शाळांमधील एकूण १८० मुलींनी सहभाग घेतला. यात १४ वर्षे आतील एकूण ५ संघांनी व १७ वर्षे आतील ७ संघांनी सहभाग घेतला तर १९ वर्षे आतील एकूण ६ संघांनी सहभाग घेतला. त्यात १४ वर्षे आतील प्रथम क्रमांक आर. सी. पटेल इंग्लिश मिडीयम स्कूल शिरपूर व द्वितीय क्रमांक मुकेश आर. पटेल इंग्लिश मिडीयम स्कूल शिरपूर या संघाने मिळवला. १७ वर्षे आतील मुलींच्या संघात आर. सी. पटेल आश्रम शाळा शिरपूर व द्वितीय क्रमांक एच. आर. पटेल कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शिरपूर या संघाने मिळवला. १९ वर्षे आतील वयोगटात प्रथम क्रमांक आर. सी. पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा निमझरी या संघाने मिळविला तर द्वितीय क्रमांक आर. सी. पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा वाघाडी यांनी प्राप्त केला विजयी विद्यार्थ्यांना व्हॉलीबॉल प्रशिक्षक विशाल पावरा, सहभागी शाळांचे क्रीडा शिक्षक, विविध खेळांचे प्रशिक्षक यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी क्रीडा शिक्षक एम.एस.पाटील, डी.बी. पाटील, अनुप चंदेल, राहुल स्वर्गे, मोहसीन कुरेशी, मयुरी भामरे, क्रीडा प्रशिक्षक करण शिंदे, सागर माळी, भूषण चव्हाण, स्वप्नील मोरे, चुनीलाल पावरा, प्रशांत गुलाले यांचे सहकार्य लाभले. सर्व विजयी संघांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.



# बभळाज येथील आर. सी. पटेल इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये घर आणि शाळा मिळून घडवतात आनंदी शिक्षण या संकल्पनेवर पालक उद्बोधन सभा

शिरपूर – तालुक्यातील बभळाज येथील आर. सी. पटेल इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये मुख्याध्यापिका सौ. सपना मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली घर आणि शाळा मिळून घडवतात आनंदी शिक्षण या संकल्पनेवर आधारित पालक उद्बोधन सभेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात विद्यादेवी सरस्वती मातेच्या पूजनाने करण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घर आणि शाळा यांच्यातील समन्वयाचे महत्त्व पालकांना समजावून सांगण्यात आले. पालक समितीचे सदस्य, सखी सावित्री समिती सदस्य, तक्रार समिती सदस्य, विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समिती व अनेक पालक उपस्थित होते. त्यानंतर मुख्याध्यापिका सपना मराठे यांनी उपस्थित पालक सदस्य यांचे पुष्प देऊन स्वागत केले. त्यांनी पालकांना विद्यार्थ्यांच्या नियमित उपस्थिती, अभ्यासातील सातत्य, चांगल्या सवयी, वाचनाची आवड, शिस्त आणि सकारात्मक वातावरण याविषयी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांच्या शिक्षणात पालकांचा सक्रिय सहभाग, शिक्षकांशी सातत्याने संवाद आणि मुलांना भावनिक आधार देण्याचे महत्त्व स्पष्ट केले. शिक्षकांची ओळख करून वर्गनिहाय शिक्षकांनी शाळेत होणाऱ्या गणित, इंग्रजी, भाषा, पर्यावरण, शिष्यवृत्तीचे विषय, अध्यापन पद्धतीचा उपक्रम हे प्रत्यक्ष पालकांसमोर सादर करण्यात आले. अक्षरांची ओळख व उच्चार कसे करावे? हे पूर्व प्राथमिक ज्युनिअर केजी व सिनियर केजी वर्गामधील चिमुकले विद्यार्थी व शिक्षिका भारती जाधव ज्यांनी उत्कृष्ट पद्धतीने पालकांसमोर सादर केले.

शिक्षिका एकता माकीजा व इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी अक्षरांचे वाचन कसे करावे? हे अतिशय सोप्या पद्धतीने पालकांसमोर सादर केले, तसेच वेगळ्या उच्चारांचे वाचन कसे करावे? हे इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षक राहुल सर यांच्यासह पालकांसमोर अतिशय सुंदर सादरीकरण केले. कृतीयुक्त गाण्यांमधून अर्थपूर्ण अध्यापन विद्यार्थी कसे करतात हे इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी व शिक्षक विक्रम राठोड यांनी अतिशय उत्कृष्ट पद्धतीने सादर केले.

पर्यावरण विषयाचे कृती उपक्रम शाळेमध्ये कशा पद्धतीने घेतले जातात ? याचे प्रत्यक्ष सादरीकरण इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षिका मोनाली बोरगावकर यांनी पालकांसमोर प्रकल्प पद्धतीने सादर केले.

वर्तमान काळातील आधुनिक साधन मोबाईल व संगणक यांच्या वापर पालकांनी आपल्या पाल्यासाठी कसे करावे? याची माहिती शिक्षका पूनम पाटील व वर्षा पाटील यांनी पालकांना दिली. पालकांनीही विविध सूचना व अनुभव मांडत शाळेच्या उपक्रमांचे कौतुक केले. अनेक पालकांनी कार्यक्रमाचा अनुभव आपल्या शब्दातून व्यक्त केला. उपस्थित सर्व पालकांनी शिक्षकांशी संवाद साधून पूर्ण सहभाग नोंदवला व शाळेला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोनाली बोरगावकर यांनी केले.




# विशेष गौरव पुरस्कारासाठी १० सप्टेंबर पर्यंत अर्ज सादर करावे

धुळे (जिमाका) – राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध क्षेत्रात अतिउत्कृष्ट कार्य करणाऱ्या धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील माजी सैनिक, युद्ध विधवा, विधवा, पत्नी, पाल्य यांना त्यांच्या कार्याबद्दल सन्मानार्थ देण्यात येणाऱ्या विशेष गौरव पुरस्कारासाठी १० सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर डॉ.निलेश पाटील (निवृत्त) यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळातील पुरस्कार प्राप्त खेळाडू, संगीत, गायन, वादन, नृत्य इ. क्षेत्रातील पुरस्कार विजेते, यशस्वी उद्योजकांचा पुरस्कार मिळविणारे, संगणक क्षेत्रात तसेच देशात तसेच पूर, जळीत, दरोडा, अपघात अगर इतर नैसर्गिक आपत्तीमध्ये तसेच देशाची व राज्याची प्रतिष्ठा वाढवतील अशा स्वरुपाचे लक्षणीय काम करणाऱ्यांना हा पुरस्कार देण्यात येतो.

तसेच आयआयटी, आयआयएम, एआयआयएमएस अशा नामवंत संस्थामध्ये प्रवेश मिळालेल्या माजी सैनिक व विधवा यांचे पाल्यांना एकरकमी १ लाख आणि शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ मध्ये दहावी मध्ये ९० टक्क्यापेक्षा अधिक गुण मिळवुन उत्तीर्ण होणारे विद्यार्थी व बारावी मध्ये ८५ टक्के पेक्षा अधिक गुण मिळवुन उत्तीर्ण होणारे विद्यार्थ्यांना २० हजार त्याप्रमाणे पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यापीठात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्यांना २५ हजार रक्कम देण्यात येते.

यासाठी माजी सैनिक,पत्नी, पाल्य यांची नावांची यादी व त्यांच्या केलेल्या उत्कृष्ट कार्याच्या माहितीसह अंतीम निवडीकरीता सैनिक कल्याण विभाग, पुणे यांच्याकडे माहिती सादर करण्यात येवून पुरस्कारासाठी निवड करण्यात येते. यात निवड झालेल्यांना पुरस्कार व प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात येते. या पुरस्कारासाठी संबंधितांनी आपले प्रस्ताव जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, माजी सैनिक विश्रामगृह आवार, संतोषी माता चौक जवळ, धुळे येथे १० सप्टेंबर, २०२६ पर्यंत पाठवावीत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर डॉ.पाटील यांनी केले आहे.

हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय – घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे – ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर – भ्रमणध्वनी – ९४२२७९८०९३ / ९०२८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार – ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)
(या वृत्तपत्रातील लिखानाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)